# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पुर्वीचे पुणे विद्यापीठ)

गणेशखिंड, पुणे—४११००७

परिपत्रक क्र. ८० / २०२४

**सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालयाच्या तसेच मान्यताप्राप्त परिसंस्थांच्या माध्यमातून पदविका, पदवी तसेच पदव्युत्तर अभ्यासक्रमांसाठी महाविद्यालयामध्ये प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी सूचना....**

- महाविद्यालय/परिसंस्थेमध्ये प्रवेश घेताना सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाची शैक्षणिक वर्ष २०२४—२५ करिता अभ्यासक्रमास संलग्नता असलेल्या पत्राची खातरजमा केल्याशिवाय प्रवेश निश्चित करू नये.

- प्रवेश प्रक्रियेसाठी वापरण्यात आलेला स्वत:चा पासवर्ड, ई—मेल आयडी, ओटीपी इत्यादी कोणालाही शेअर करू नये/वापरण्यास देऊ नये.

- केंद्रीय पध्दतीने व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेणा—या विद्यार्थ्यांनी संबंधित महाविद्यालयामधील/संस्थांमधील प्रवेश केंद्रीय पध्दतीने होत असल्याचे त्या—त्या प्रवेश नियंत्रण समितीच्या वेबसाईटवर जाऊन प्रत्यक्ष माहिती घ्यावी.

- विद्यार्थ्यांनी प्रवेश निश्चित करण्यापूर्वी स्वत: विहीत पात्रता धारण करत असल्याची खातरजमा करून घ्यावी.

- अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेताना अभ्यासक्रमाची मान्यता व निर्धारित शुल्क याची खातरजमा करण्यात यावी. शुल्क भरण्याची कार्यवाही महाविद्यालय/संस्थेच्या खात्यामार्फतच करावी. विद्यार्थ्यांनी शुल्क कोणत्याही व्यक्तीच्या वैयक्तिक बॅंक खात्यावर ट्रान्सफर करू नयेत.

- कोणतीही संयुक्तिक ऑफर व्हॅल्यु ॲडीशन एकावर एक मोफत अशा स्वरूपाच्या कोणत्याही योजना सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाकडून महाविद्यालय/संस्थांमधील अभ्यासक्रमासाठी दिल्या जात नाहीत. कृपया अशा प्रकारच्या प्रलोभनास बळी पडू नये. जर विद्यार्थ्यांनी स्वत:हून अशा अभ्यासक्रमास प्रवेश घेतल्यास त्यास संबंधित विद्यार्थी पूर्णत: जबाबदार राहील.

- शैक्षणिक वर्षाचे शुल्क भरण्यापूर्वी महाराष्ट्र शासनाने वेळोवेळी जाहिर केलेल्या योजनांचा लाभ घेण्यासाठी महाविद्यालयांकडून संपूर्ण माहिती घ्यावी.

जावक क्र. : संप्र/689
दिनांक : 19/04/2024

(प्रा. डॉ. विजय खरे)
प्रभारी कुलसचिव